**<u>खटला क्र. २८९/पीडब्ल्यु/२०२५</u>** **<u>निशाणी क्र. १६२</u>**

साक्षीदार क्र. ८

मी शपथपुर्वक सांगतो की,

माझे नाव : तुषार ज्ञानेश्वर शिंदे,

वय : ३६ वर्षे,

व्यवसाय : खाजगी कंपनीमध्ये नोकरी,

पत्ता : २०४, वरद विनायक सोसायटी, पाथाडी रोड, डोंबिवली पूर्व, जि. ठाणे.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री. रविंद्र पाटील यांचे तर्फे:—</u>**

१. मी आरोपी प्रज्योत भागवत याला ओळखतो. आरोपी हा माझा माझा शाळेचा वर्ग मित्र आहे. मी व प्रज्योत इयत्ता ८ ते १२ एकाच वर्गात शिकलो. इयत्ता १२ चे शिक्षण झाल्यानंतर साधारणपणे ६ वर्षाच्या गॅपनंतर सन २०१६ किंवा २०१७ मध्ये पुन्हा मी व प्रज्योत भागवत एकत्र आलो. त्या काळात आम्ही मित्रांचा एक ग्रुप तयार केला होता. तो ग्रुप तयार झाल्यानंतर आम्ही वाढदिवस व इतर काही प्रसंग असल्यास एकमेकाना भेटत असू. प्रज्योत हा कुठल्यातरी संस्थेमध्ये काम करत होता. परंतु त्याच्या नोकरीचे ठिकाण व त्याचे पद मला माहिती नव्हते.

२. साधारणपणे सन २०२० च्या शेवटी प्रज्योत याने मला शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यास इच्छुक आहे का असे विचारले होते. मी त्यावेळी त्यास सुरुवातीस विचार करुन सांगतो असे कळविले. त्यानंतर मी सन २०२१ मध्ये त्यास शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीसाठी त्याच्या अकाउंटमध्ये ५०,००० रुपये पाठवले होते. त्यानंतर प्रज्योत हा मला त्या गुंतवणुकीवर महिन्याला ५००० देत असे.

**(न्यायालयाची दुस—या सत्राची वेळ संपल्याने पुढील कामकाज दिनांक ०९.०३. २०२६ पर्यंत तहकूब करण्यात येत आहे. )**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

स्वाक्षरी/—

**(वैभव व. कुलकर्णी)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**५ वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक : ०५/०३/२०२६.**